# मराठी साहित्य प्रवाहात ग्रामीण साहित्याची गरज

सारिका सचिन भोसले

स. ब. खाडे महाविद्यालय, कोपार्डे, ता. करवीर, जि. कोल्हापूर

DOI: https://doi.org/10.5281/zenodo.17260048

**ABSTRACT:**

मराठी साहित्य प्रवाहात ग्रामीण साहित्याची गरज हा महत्त्वाचा घटक आहे. १९६० नंतर उदयास आलेल्या या प्रवाहाची प्रेरणा 'गाव' आहे, ज्यात शेती आणि गावकरी जीवन केंद्रस्थानी आहे. 'पिराजी पाटील' (१९०३) ही पहिली ग्रामीण कादंबरी आणि बहिणाबाई चौधरी पहिली ग्रामीण कवयित्री मानली जाते. स्वातंत्र्यापूर्वी र.वा. दिघे तर स्वातंत्र्योत्तर गो.नी. दांडेकर, व्यंकटेश माडगुळकर, अण्णाभाऊ साठे यांसारख्या लेखकांनी या साहित्याला समृद्ध केले. ग्रामीण जीवनातील वास्तव, बदलती संस्कृती, कृषी जीवन आणि समूह भावना शहरांतील लोकांना समजावून सांगणे, तसेच ग्रामीण लेखकांमध्ये आत्मविश्वास जागृत करणे ही ग्रामीण साहित्याची मुख्य उद्दिष्ट्ये आहेत. आधुनिकतेमुळे खेड्यांचे स्वरूप बदलले आहे, परंतु ग्रामीण संस्कृतीचे संवर्धन आणि साहित्याचा चिरकाळ टिकाव यासाठी साहित्य आणि समाज यात एकसंधता येणे गरजेचे आहे.

**KEYWORDS:**

ग्रामीण साहित्य, मराठी साहित्य, कृषी जीवन, ग्रामीण संस्कृती, लेखक.

साहित्य म्हटलं की आपल्या समोर अनेक प्रकार येतात. दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य, लोक-साहित्य, आदिवासी साहित्य अशा अनेकांचा समावेश होतो. १९६० नंतर अनेक साहित्य प्रवाह उदयाला आले. प्रत्येक साहित्य प्रवाहाचा विशिष्ट दर्जा व स्थान आहे, पण त्यामध्ये ग्रामीण साहित्य महत्त्वाचा घटक मानला जातो. मोहन पाटील यांच्या मते 'गाव ही ग्रामीण साहित्याची खरी प्रेरणा आहे'. आपल्याकडे १२ बलुतेदार आणि १८ अलुतेदार मानले जातात. शेती आणि त्याभोवतीचे जीवन हाच ग्रामीण साहित्याचा महत्त्वाचा घटक आहे. गावातले

समाजजीवन यांच्या अवतीभोवतीच तर ग्रामीण साहित्य फिरते. ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने विचार केल्यास त्यामध्ये कथा, कादंबऱ्या, कविता, प्रवासवर्णने यांचा समावेश होतो. 'पिराजी पाटील' ही कादंबरी रामचंद्र विनायक टिकेकर यांनी १९०३ मध्ये प्रसिद्ध केली. ही साहित्यामधील पहिली ग्रामीण कादंबरी मानावी लागेल. सदरची ही कादंबरी छोटी असली तरी यामध्ये दुष्काळाचे चित्र अत्यंत प्रभावीपणे मांडले आहे. पहिली ग्रामीण कवयित्री म्हणून बहिणाबाई चौधरी यांचा उल्लेख करावा लागेल.

ग्रामीण साहित्यामध्ये स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्ये र. वा. दिघे, ग. ल. ठोकळ, बा. सी. मर्ढेकर, न. चिं. केळकर, रघुवीर सामंत अशा बऱ्याच जणांचा समावेश होतो आणि स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये गो. नी. दांडेकर, व्यंकटेश माडगुळकर, अण्णाभाऊ साठे, रणजित देसाई, शंकर पाटील, आनंद यादव, हमीद दलवाई अशा अनेकांचा समावेश होतो. ग्रामीण जीवनाविषयीची जाणीव ही सर्वांगांनी शहरामध्ये असणाऱ्या शहरी लोकांच्या जीवनाशी करून देण्याचे काम ग्रामीण साहित्याने केले पाहिजे. ग्रामीण भागातील साहित्यकारांकडे आणि त्यातच घडू पाहणाऱ्या साहित्यिकांकडे समग्र दृष्टीने पाहण्याची गरज आहे. 'खेडयाकडे चला' असा मूलमंत्र महात्मा गांधीजींनी दिला खरा, पण कालानुरूप किंवा परिस्थतीनुसार समाजामध्ये एक प्रकारचा तोचतोचपणा होता आणि तो नष्ट करण्यासाठी, अनेक प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी परिवर्तन घडण्याची गरज असते. नव्याने घातलेल्या समाजव्यवस्थेमध्ये सांस्कृतिक विषमता नष्ट करून ग्रामीण साहित्याला वेगळा दर्जा व स्थान प्राप्त करून देण्यासाठी त्याप्रमाणे अंतर्मुख होऊन शहरी भागातील जाणकार समीक्षक, साहित्यिकांनी आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे.

**उद्दिष्ट्ये:**

1. ग्रामीण साहित्याला दर्जा व प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.
2. ग्रामीण भागातील लेखकाला मार्गदर्शन करून साहित्याच्या संशोधनास चालना देणे.
3. अनेक ग्रामीण (साहित्यिकांमध्ये) लेखकांमध्ये असणारा न्यूनगंड

बाजूला करून त्यांच्यात आत्मविश्वास जागवणे.

4. भारतासारख्या कृषीप्रधान संस्कृतीमध्ये मराठी भाषा व संस्कृतीचे संवर्धन करणे.

5. ग्रामीण साहित्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करणे.

**ग्रामीण साहित्याची गरज**

ग्रामीण संस्कृतीचे अंतरंग उलगडून बघण्याअगोदर आपण ग्रामीण साहित्य हा आपल्या भारतामधील संस्कृतीचा एक वेगळा आणि खास असा पैलू आहे. ग्रामीण साहित्य समजून घ्यायचे असेल तर ग्रामीण भागाची रचना, स्वरूप सांगणाऱ्या, प्रभावीपणे चित्रण करणाऱ्या पुस्तकांचा अभ्यास करणे गरजेचे आहे:

१. गावगाडा (त्रिंबक नारायण अत्रे)

२. आमचा गाव बदलापुर (नारायण गोविंद चाफेकर)

३. गावरहाटी (वि. म. दांडेकर, ग. भा. जगताप)

४. गावगाड्याबाहेर (प्रभाकर मांडे)

कृषीजीवन ग्रामीण साहित्याचा महत्त्वाचा घटक आहे. निसर्ग, शेती, प्राणीजीवन, तिथले वातावरण, गावकरी, घटना, प्रसंग इत्यादी अनेकांचा समावेश होतो. एकंदर पाहता ग्रामीण साहित्यामध्ये गावातले समाजजीवन हाच मुख्य भाग आहे. ग्रामीण भागातील सण, समारंभ, रूढी, प्रथा, परंपरेनुसार साजरे करतात आणि त्यामध्ये समूहभावना म्हणजेच एकजुटीने राहण्याचा मुख्य हेतू असतो. गावरान बोलीभाषा हाही एक घटक महत्त्वाची भूमिका बजावतो. त्यामुळे यातूनच शहरी भागापेक्षा ग्रामीण भागातील संस्कृतीचे आपल्याला यथार्थपणे दर्शन घडते.

लोकशाही लाभलेल्या भारतामध्ये राजकारणाचा शिरकाव झाला आणि ग्रामीण भागामध्ये सत्तेचे वारे वाहू लागले आणि या सगळयाचा परिणाम हा प्रामुख्याने खेड्यांवर पर्यायाने ग्रामीण भागात झाला आणि खेड्यांना महत्त्व प्राप्त झाले. पूर्वीपासून चालत आलेल्या खेड्याचे रूपरंग बदलण्यास सुरुवात झाली म्हणजेच थोडक्यात खेड्यांचे स्वरूपच बदलले. ज्ञान, तंत्रज्ञान, विज्ञान, औद्योगिकीकरण या सगळया बदलांचे

परिवर्तन ग्रामीण भागामध्ये प्रकर्षाने दिसू लागले आणि त्यामुळे राजकारणाचे वादळ खऱ्या अर्थाने खेड्यांमध्ये शिरले. आपण विचार करता पूर्वीही आणि आजही खेड्यांमध्ये समूहभावना म्हणजेच एकीची भावना मोठ्या प्रमाणावर असते. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर सत्तेसाठी, राजकारणासाठी सरकारी सुविधा, सोयी, शासकीय योजना यांचा वापर होऊ लागला आणि यामध्ये सर्वसामान्य माणूस हाच केंद्रबिंदू होता.

समाजप्रवाहामध्ये शिक्षणक्षेत्राने मोठी कामगिरी बजावली आणि नवे वळण प्राप्त झाले. शिक्षण खेड्याखेड्यांमध्ये पोहोचले. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यानंतरही हातावर मोजण्याइतकीच सामान्य जनता शिक्षण घेत होती. उच्चवर्णियांना सोडले तर तळागाळातील लोकांना शिक्षणाचा मागोवाही नव्हता. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी सुरू केलेली शिक्षणाची कवाडं पोहोचण्यासाठी वेळ लागला, पण राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मोलाच्या साथीने आणि यांच्या रचलेल्या पायावर कळस बांधण्याचे काम कर्मवीर भाऊराव पाटील, बापूजी साळुंखे यांनी केले. यांच्या शिक्षणक्षेत्रातल्या कामगिरीमुळे तळागाळातील जनतेपर्यंत म्हणजेच वाडीवस्तीपर्यंत शिक्षणाचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला आणि नवीन अशी सुशिक्षित पिढी तयार होण्यास मदत झाली.

ग्रामीण साहित्याच्या दृष्टीने विचार केला तर आर्थिक, कृषी, शैक्षणिक, औद्योगिक सर्वच क्षेत्रामध्ये अमूल्याग्र परिवर्तन घडून आले, पण सामाजिक क्षेत्र मात्र पाठीमागे पडले. ग्रामीण समाज आता प्रगल्भ झाला आहे. अजूनही गरज आहे ती यासाठी की, खेडेगाव हे गाव म्हणून अबाधित न राहता त्याचा विकास, ग्रामीण भागाचे संतुलन, संवर्धन आणि होणारी प्रगती टिकवून ठेवणे गरजेचे आहे. साहित्य आणि समाज यांच्यामध्ये एकसंधानता येणे आवश्यक आहे. यामुळे ग्रामीण साहित्यामध्ये प्रगती होईल. साहित्यनिर्मिती ही सामाजिक समस्या सोडविण्यासाठी, आनंदासाठी, त्यांच्याविषयी असणारी बांधिलकी याचा विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्रामीण साहित्य चिरकाळ टिकून राहण्यासाठी प्रयत्नशील हवे. नाहीतर आपल्याकडे असणारे हे साहित्य जे आपण जतन करून ठेवले आहे, ते फक्त ऐतिहासिक ठेवा याप्रमाणेच राहील. त्यामुळे साहित्यिकाकडून परिवर्तनाची अपेक्षा

करावी, पण तिलाही काही मर्यादा आहेत:

१) सामाजिक बांधिलकी

२) कल्याणकारी धोरणे, शासकीय सुविधा

३) सामाजिक पार्श्वभूमी

४) साहित्यासाठी पोषक वातावरण निर्मिती

५) सामाजिकता

इत्यादी घटक साहित्यिकाच्या दृष्टीने महत्त्वाची असतात. म्हणून 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती' या पुस्तकामध्ये मोहन पाटील म्हणतात: "परंपरा आणि नवी औद्योगिक संस्कृती यातील संघर्ष सातत्यातून घडत आहे. जी काळाच्या कसोटीवर टिकून राहील उद्याच्या खेड्याची संस्कृती असणार आहे आणि त्या दिशेने ग्रामीण साहित्याची लेखणी हवी."

ग्रामीण जीवनामध्ये मनुष्याला जातिव्यवस्थेला स्थान आहे. पूर्वीपार चालत आलेली जातिव्यवस्था, वर्णव्यवस्था अनादी काळापासून सुरूच आहे. त्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जातिव्यवस्था नष्ट करण्यासाठी अगदी मोलाची कामगिरी केली आहे. त्यामुळेच तर आज दलित समाजासाठी शिक्षणाची कवाडं खुली झाली. आज समाज अविरतपणे शिक्षण घेत आहे. सर्व क्षेत्रांमध्ये प्रभावीपणे वाटचाल करत आहे. ग्रामीण साहित्याप्रमाणे दलित, उपेक्षित समाजालासुद्धा साहित्याने तारले आहे. अनेक दलित बांधव, लेखक, साहित्यिक साहित्याच्या लेखणीतून प्रभावीपणे आपले अनुभवकथन, होणारी उपेक्षा, हालअपेष्टांचे प्रभावीपणे चित्रण करून मांडत आहेत. शहरीकरण आले, खेड्यातही आले आणि याचा परिणाम जातिव्यवस्था बऱ्याच अंशी प्रमाणात नष्ट होऊ लागली आहे. स्वातंत्र्य मिळण्याअगोदर आणि स्वातंत्र्यानंतरही केंद्र सरकारने, राज्य सरकारने साकारलेले ग्रामीण खेडे याचा विचार केला तर आपण जुने खेडे आणि नवे खेडे अशा संकल्पना मांडतो. ग्रामीण लेखक आणि त्याच्या अवतीभोवतीचे वातावरण म्हणजेच भोवतालचे सामाजिक वास्तव यांचा फार जवळचा संबंध आहे. लेखकाला आलेला अनुभव, स्वतःच्या शोधातून आलेला संवाद, संबंध त्यामुळेच त्याचे अनुभव विश्व आकाराला येते. म्हणजेच ग्रामीण साहित्यामध्ये बदलत्या खेड्यांचा, तेथील ग्रामीण जीवनाचा समावेश होतो.

प्रसिद्ध साहित्यिक डॉ. आनंद यादव त्यांच्या 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव' या पुस्तकामध्ये त्यांनी आजचा ग्रामीण साहित्यिक हा शहरात जाऊन आधुनिकतेचे संस्कार घेतो आणि त्याच्या अनुषंगाने शहरी संस्कारांना, मूल्यांना बाजूला ठेवून साहित्याची निर्मिती करत असतो. तसेच डॉ. आनंद यादव यांचे असेही म्हणणे आहे की, गांधीवाद, साम्यवाद आणि समाजवाद या तीनही विचारणीमुळे भारतीय शेतकरी, हजारो खेड्यातून पसरलेली दारिद्र्यता, अज्ञानी सामान्य जनता यांचे दर्शन घडवतो आणि आपल्याला त्याची जाणीव करून देतो. महात्मा गांधीजींच्या विचारसरणीचा महाराष्ट्रातील सुशिक्षित वर्गावर परिणाम झालेला दिसतो. ग्रामीणता असणे लेखकासाठी कुठलीही ग्रामीण जीवनावर आधारित कलाकृती निर्माण करण्यासाठी लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा भाग मानावा. कारण ग्रामीण जीवन समजून, उमजून, त्यातील अनुभव घेऊन, त्याच्याशी समरस होऊन, त्याच्या दृष्टीने स्वतःच्या अनुभवांची मांडणी केली तर आपण ध्येयापर्यंत पोहोचता आणि एक चांगल्या, उत्तम प्रतीची साहित्य कलाकृती निर्माण होते. त्यामुळेच तर साहित्यामधील ग्रामीणता महत्त्वाचा घटक मानला जातो.

ग्रामीण जीवन साहित्य बदलाची भूमिका बजावत आहे. आपल्या कृषीप्रधान भागामध्ये पण परिवर्तन घडताना दिसते. पूर्ण परंपरागत केली जाणारी शेती ही आता आधुनिक साधनांच्या द्वारे केली जाते. शेतीमध्ये अनेक अवजारे, तंत्रज्ञान, पद्धती यामुळे शेती करणे सोपे झालेले आहे. पूर्वीसारखे दिवसभर शेतात राबून काम करणे या संकल्पनेला कुठेतरी आळा बसत आहे. शेतामध्ये पेरणी, नांगरणी, भांगलणी, कुळपणी अशा अनेक कामांकरिता ट्रॅक्टरसारख्या अवजड वाहनाचा उपयोग करून त्याच्या मदतीने शेती केली जाते. त्यामुळे आताचा शेतकरी शेतीपुरताच मर्यादित राहिला नाही. त्यामुळे शेतीच्या अनुषंगाने येणारी शेतांमधली गाणी, मोटंवरची गाणी, गुजगोष्टी आता कालबाह्य होऊन त्याची जागा आता वेगवेगळ्या नवीन साधनांनी घेतली आहे. आजकाल कुठलेही सणवार, समारंभ साजरे करत असताना पारंपारिकता, रूढी, प्रथा थोडी बाजूला ठेवली जाते.

उदा. – पूर्वीच्या काळी साजरा होणारा बेंदूर, बैलपोळा सण आज नव्याने साजरा करतात. बैलाच्या शर्यती ठेवतात. तसेच गौरी-गणपतीचा सण साजरा करण्याची पूर्वीची पद्धत आणि आताच्या पद्धतीमध्ये

पूर्वीच्या काळी स्त्रिया शेतात जाऊन गौरी, शंकरोबा काढून आणून नदीवर जाऊन घरी यायच्या, दारात पूजन करून सोनपावलांनी गौरी आत घेत असत. आता गौरी-शंकरोबा आपल्याला बाजारात विकत मिळतात, तेच घरी आणून त्याचे पूजन करतात, गौरी बसवतात. थोडक्यात सांगायचे झाले तर बदल स्वीकारून भक्ती आणि सण-उत्सव पार पाडणे हीच भूमिका महत्त्वाची वाटते.

पारंपरिक पद्धतीचे सणवार, उत्सव, देवळे, समाजमंदिर, पंचायती, साखर कारखाने, दूध डेअरी, सोसायटी, गिरण्या, विभक्त कुटुंब पद्धती, नव्याने आलेले आंतरजातीय विवाह पद्धती एकंदरीत ग्रामीण समाजजीवनाचे अनेक पैलू नष्ट होऊन आता त्याची जागा नव्याने घेतली आहे आणि ग्रामीण भागातील खेड्यातील माणूस या बदलाच्या मानसिकतेचा स्वीकार करत आहे. उदा. पूर्वीच्या काळी लग्न कार्य पाच दिवस चालत असे, पण अलीकडे हौस म्हणून सोडली तर यादीपेशादी सारख्या नव्याने लग्न संस्था प्रचलित होत आहेत. वेळ वाचतो, खर्चही वाचतो आणि सध्याच्या धावपळीच्या आयुष्यात एका दिवसात लग्न कार्य होऊन सगळयांनाच मोकळीक मिळते आणि हीच मानसिकता अलीकडे रूढ होत आहे.

ही झाली एक बाजू, पण अलीकडे प्रसंगी नव्या गोष्टींचा उबग येऊन परत पारंपरिक जीवनाकडे मन धाव घेऊ पाहते. जसे की लग्न समारंभामध्ये वधूची वेशभूषा सहावारी साडीची जागा नव्याने नऊवारी साडीने घेतली आहे. तसेच काही पारंपरिक खाद्यपदार्थ जसे की तेलावरची पुरणपोळी, तांदळाचे उकडीचे मोदक नव्याने शिकण्याची कला अवगत होत आहे. म्हणूनच तर साहित्यिक मोहन पाटील यांच्या 'ग्रामीण साहित्य आणि संस्कृती' या पुस्तकामध्ये त्यांनी विचार मांडला आहे. बदलती मूल्ये आणि त्याने बदलत जाणारी ग्रामीण माणसाची मानसिकता ही नव्या ग्रामीण साहित्याची दिशा आहे आणि ग्रामीण साहित्यने याच वाटेने चालावे आणि अशा प्रकारची खुणगाठ प्रत्येक ग्रामीण साहित्यकाने आपल्या मनाशी बांधावी ही अपेक्षा आहे.

## समारोप

डॉ. आनंद यादव यांनी 'ग्रामीणता साहित्य आणि वास्तव' या आपल्या पुस्तकामध्ये केलेल्या प्रश्नांचे उत्तर आपण शोधणे गरजेचे आहे.

प्रश्न असा की ग्रामीण साहित्य सवतासुभा आहे?

तर ग्रामीण जीवनाविषयीची जाणीव आणि त्यातील अनुभव सर्वांगांनी शहरी जीवनामध्ये करून देण्याचे काम करायला हवे. त्यामुळे ग्रामीण साहित्य म्हणजेच ग्रामीणता टिकवून ठेवायची असेल, तर शहरातील नागर संस्कृतीमधील विचारवंत, साहित्यिक, लेखक, समीक्षक, प्रकाशक, संपादक, प्रकाशन समीक्षकांनी ग्रामीण लेखकाकडे समग्र दृष्टीकोनातून विचार करून त्यांच्याकडे पाहण्याची गरज आहे. आजचे खेडे उद्या असणार नाही किंवा ग्रामीण साहित्याचे उद्याचे भविष्य काही नाही अशी अपेक्षा करू नये. कारण आपला भारत शेतीप्रधान देश आहे. निम्मापेक्षा जास्त जनता शेतीवरच अवलंबून आहे. त्यामुळे उद्योग प्रधानता आली तरी आपली ग्रामीणता, ग्रामीण साहित्य आधुनिक ग्रामीण साहित्याच्या कक्षेमध्ये बसवून व्यापक व मोठ्या अर्थाने त्याचा विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे मराठीमध्ये अनेक साहित्य प्रवाह आहेत, बदलानुसार येतील, पण ग्रामीण साहित्याची निकड ही विशेष आहे आणि त्यादृष्टीने आपण नवीन पिढीने, सगळयांनी विचार करणे गरजेचे आहे.

निष्कर्ष

बदलत्या नवीन साहित्य प्रवाह प्रकारानुसार पारंपरिक म्हणजेच आपले ग्रामीण साहित्याचा वसा अबाधित ठेवणे प्रत्येकाला समजणार आहे का? ग्रामीण साहित्यामध्ये नव्याने भर घालण्यासाठी नवीन पिढी, तरुण लेखक, साहित्यिक यांची महत्त्वाची भूमिका आहे. ग्रामीण भाग, खेड्यातील जीवन, घटना, प्रसंग, शेती, निसर्ग या सर्वावर ग्रामीण साहित्य प्रकाश टाकते. खेड्यांमध्ये घडणारे परिवर्तन, बेकारी, सुशिक्षित तरुण, शासकीय योजनांचा फसवेपणा, अभाव इत्यादी गोष्टींवर प्रकाश टाकणे, खेड्यापाड्यातील नवीन ग्रामीण लेखन करणाऱ्या नव्याने आलेल्या ग्रामीण चळवळीचे महत्त्व सांगून त्यादृष्टीने दिशा देण्याचे काम करणे, ग्रामीण साहित्य सशक्त आणि चैतन्यपूर्ण, नावीन्यपूर्ण नव्या रूपामध्ये मांडण्यासाठी मदत करणे.

## संदर्भ:


1. मोहन पाटील - ग्रामीण साहित्य आणि संस्कृती, आवृत्ती पहिली जुलै २००१, प्रकाशिका – सौ. उषा मुळाटे, स्वरूप प्रकाशन
2. द. ता. भोसले - ग्रामीण साहित्य एक चिंतन, १९८८ प्रकाशक अनिल मेहता
3. डॉ. आनंद यादव - ग्रामीणता साहित्य आणि वास्तव, प्रथमावृत्ती ६ मे १९८१, प्रकाशक - अनिल मेहता.
4. डॉ. रवींद्र ठाकर- मराठी ग्रामीण कादंबरी १८८० ते २०००, प्रथमावृत्ती- २५ जानेवारी १९९२, प्रकाशक- श्री. एल. व्ही. तावरे


**Funding:**

This study was not funded by any grant.

**Conflict of interest:**

The Authors have no conflict of interest to declare that they are relevant to the content of this article.

**About the License:**

© The Authors 2024. The text of this article is open access and licensed under a Creative Commons Attribution 4.0 International License.